प्रेसनोट

## इंदिरा गांधी जंयती

जा.क्र. ७७५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१९/११/२०१७

भंडारा:– पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. १९/११/२०१७ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु, यांच्या मार्गदर्शनाखाली मा. अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्यांचे जिवण चारीत्र्य व कार्यप्रणालीबाबत माहीती देण्यात आली.

इंदिराजी जन्म १९ नोव्हेबर १९१७, वडिल जवाहरलाल नेहरु व आई कमला नेहरु यांनी अलाहाबाद पुणे, मुंबई, कलकत्ता याठिकाणी त्यांचे शिक्षण झाले. व उच्च शिक्षणासाठी इग्लड मध्ये "आक्सफोर्ड विदयापीठात" प्रवेश घेतला पण काही कारणास्तव न मिळविता भारतात त्या परत आल्या. इंदिराजी यांनी सन १९३० मध्ये वयाच्या १३ व्या वर्षापासुन राजकारणात भाग घेवुन लहान मुलांची 'वानर सेना' तयार केली व सन १९४२ मध्ये 'चलेजाव' आंदोलनात भाग घेवुन तुरुंगवास भोगला. आणि १९६४ मध्ये नेहरुजीच्या मृत्यु नंतर लाल बहादुर शास्त्री हे भारताचे पंतप्रधान बनले. त्यांच्या मंत्रीमंडळात त्या नभोवाणी खात्याच्या मंत्री राहील्या व शास्त्रीजींच्या निधनानंतर १९६६ मध्ये भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान होण्याचा मान त्यांना मिळाला. १९७१ मध्ये त्यांनी 'गरिबी हटाव' ही घोषणा दिली. व त्याच काळात त्यांना भारतरत्न या सर्वोच्य नागरी सन्मान प्रदान करुन गौरव केला. १९७२ मध्ये पाकीस्तानशी व्दीपक्षीय 'सिमला करार' करुन १९७५ मध्ये आणिबाणी लागु केली व पंजाबमध्ये शिख अतिरेकी स्वतंत्र खलीस्तान राष्ट्र तयार करण्यासाठी विघातक कारवाया करुन त्यांनी सुवर्ण मंदिरात शस्त्रे ठेवण्यास सुरुवात केल्यामुळे त्या देशद्रोही अतिरेक्यांना मारावे लागले. या घटनामुळे अतिरेकी त्यांच्या अंगरक्षकांनी ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी सतवंतसिंग व बेअंतसिंग यांनी घालुन हत्या केली. इंदिरा गांधी १९७१ मध्ये भारतरत्न पुरस्कार प्राप्त झाले. भारताच्या पहील्या 'महिला पंतप्रधान' व भारतरत्न मिळविणारी पहीली महिला. त्या १८ वर्ष भारताच्या पंतप्रधान राहील्या. त्याच्या अमानुष हत्येने नुसता भारतच नव्हे तर सारे जग हळहळले. इंदिराजींना जे मरण आले. ते शुराचे मरण आले. इंदिरा गांधीजींची जंयती राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेवुन साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाला पोनी. खंडारे वायरलेस विभाग भंडारा, सपोनि हत्तीमारे, जिवीशा भंडारा, सपोनी. कदम पोलीस कल्याण विभाग भंडारा, सपोनी. काळे स्थागुशा भंडारा, पोउपनी पंधरे श्वान पथक भंडारा, पोउपनी. आडोळे दोषसिध्दी विभाग भंडारा, पोलीस मुख्यालय राखीव पोलीस निरीक्षक वर्मा, पोलीस उपनिरीक्षक प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(पोउपनी. ए. बी. तुळजेवार)
अपर पोलीस अधिक्षक
वाचक फौजदार भंडारा
दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता